# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## दिव्यांग उमेदवारांची भरती मोहिमेंतर्गत जाहिरात

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खालील संवर्गातील दिव्यांग उमेदवारांकरीता आरक्षीत असलेली रिक्त पदे नियमीत वेतनश्रेणीत भरण्यासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांकडून त्यांचे अर्ज दिनांक १५/०९/२०१७ ते दिनांक ०५/१०/२०१७ या कालावधीत ठाणे महानगरपालिकेच्या recruitment@thanecity.gov.in या ई-मेल आयडीवर संपुर्ण तपशीलासह मागविण्यात येत आहे. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा तसेच पोस्टाद्वारे अथवा हस्ते प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

**वर्ग १**

| अ.क्र | पदाचे नाव | रिक्त पद | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १ | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु | मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस. पदवी अनुभवास प्राधान्य | रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० |

**वर्ग ३**

| अ.क्र | पदाचे नांव | रिक्त पद | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता | १ | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | मान्यता प्राप्त विद्यापिठाची स्थापत्य शाखेतील बी.ई. किंवा तत्सम पदवी अथवा डी.सी.ई. (पदविका) स्थापत्य. | रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० |
| २ | एक्सरे टेक्निशियन | १ | अंधत्व किंवा क्षीण दृष्टी उपलब्ध न झाल्यास चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू अन्यथा श्रवण शक्तीतील दोष | विज्ञान शाखेचा पदवीधर (भौतिकशास्त्र विषयासह) "क्ष-किरण तंत्रज्ञ" म्हणून काम केल्याचा १ वर्षाचा अनुभव. | रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० |
| ३ | भांडार लिपीक | १ | श्रवण शक्तीतील दोष उपलब्ध न झाल्यास क्षीण दृष्टीसाठी अन्यथा चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू | पदवीधर, कॉमर्स शाखेतील पदवीधारकास प्राधान्य, अनुभव- शासकीय/निमशासकीय अथवा नामांकित संस्थेमध्ये स्टोअर किपर म्हणून कमीत कमी ४ वर्षे काम केल्याचा अनुभव | रु.५२००-२०२०० ग्रेड पे २४०० |

**वर्ग ४**

| अ.क्र | पदाचे नांव | रिक्त पद | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बालवाडी आया | १ | श्रवण शक्तीतील दोष उपलब्ध न झाल्यास चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू अन्यथा अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | ४ थी पास | रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| २ | दवाखाना आया (आरोग्य) | २ | श्रवण शक्तीतील दोष-१ पद अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-१ पद उपलब्ध न झाल्यास चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू | ४ थी ते ९ वी पास पर्यंत व शारिरीक दृष्टया पात्र | रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| ३ | फिल्ड वर्कर | ५ | श्रवण शक्तीतील दोष-२ पदे अंधत्व किंवा क्षीण दृष्टी-२पदे चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू-१ पद | ४ थी पास, | रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८०० |
| ४ | लॅब असिस्टंट | १ | अंधत्व किंवा क्षीण दृष्टी उपलब्ध न झाल्यास चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू अन्यथा श्रवण शक्तीतील दोष | १० वी पास, प्रयोग शाळेतील कामाचा ५ वर्षाचा अनुभव. | रु.५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| ५ | बिगारी (उद्यान) | ३ | श्रवण शक्तीतील दोष-२ पदे अंधत्व किंवा क्षीण दृष्टी-१ पद उपलब्ध न झाल्यास चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू | साक्षर | रु.५२००-२०२०० ग्रेड पे १८०० |

**निवड पध्दती :-**

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.मातंसं/नस्ती ०४/४६०/३९, मंत्रालय दि.१० फेब्रुवारी, २००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांकरिता दिव्यांग उमेदवारांसाठी विहित मार्गाने उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांस शारिरीक पात्रतेसंदर्भात, संबंधित विषयाच्या तज्ञांचा समावेश असलेल्या वैदयकिय मंडळाने प्रमाणित केल्यानंतरच अशा दिव्यांग व्यक्तींची शासन सेवेत संबंधित संवर्गात खाली दर्शविलेले निकष विचारात घेऊन, नियुक्ती करण्यांत येईल.

अ) संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार अर्हताधारक असेल तर.

ब) त्या त्या संवर्गातील पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन, त्याप्रमाणे वैद्यकिय मंडळाने सक्षम ठरविल्यास.

२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.एसपीपी२००६/अपंग आरक्षण/प्र.क्र.२८१/पेल-१०,मंत्रालय,दि.११ फेब्रुवारी, २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे दिव्यांग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) पोट नियम १९९५ च्या कलम २ (टी) नुसार सदर आरक्षणासाठी दिव्यांग उमेदवाराचे दिव्यांगत्व किमान ४०% असणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.न्यायप्र-२००९/प्र.क्र.९/सुधार-३,मंत्रालय,दि.१३ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे जास्तीत जास्त दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात यावे, अशी तरतूद असून सदर तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत प्राप्त अर्जाची दिव्यांग आरक्षित प्रवर्गाप्रमाणे छाननी करून पात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. वरील तक्त्यात नमूद केलेल्या पदांकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन, शैक्षणिक पात्रतेनुसार जास्तीत जास्त असलेले शैक्षणिक गुण तसेच ज्याचे जास्तीत जास्त दिव्यांगत्व आहे त्यांचा सरासरी विचार करून, वर्ग ३ व वर्ग ४ या संवर्गातील उमेदवारांची मुलाखत न घेता थेट नियुक्ती करण्यात येईल.

४. वर्ग १ या संवर्गातील वैदयकिय अधिकारी या पदाकरिता उमेदवारांची निवड करण्यासाठी जाहिरातीनुसार उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन प्रकियेत मुदतीत आल्यानंतर आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व जास्तीत जास्त दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारास मुलाखतीसाठी बोलावून त्याद्वारे गुणानुक्रमे उमेदवारांची निवड करण्यात येईल.

**टिप :-**

१. जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अशंत: बदल करणे, पदांचे एकुण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाट अथवा घट करण्याचे तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करून, उमेदवारांची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखून ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवारांना कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता अगर करता येणार नाही.

२. शासन परिपत्रक क्र.एचआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२,दि.०१ नोव्हेंबर, २००३ नुसार नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शासन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्याकरिता वयाची पदाच्या विशेषज्ञतेनुसार व आवश्यकतेनुसार वयाच्या ४५ / ५० पर्यंत राहील.

३. सदर जाहिरातीनुसार भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार महापालिका प्रशासन राखून ठेवत आहे.

**अटी व शर्ती :-**

१. उमेदवारांना मुलाखतीसाठी येण्या- जाण्यासाठीचा प्रवास खर्च व इतर खर्च दिला जाणार नाही.

२. उमेदवाराने अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या (जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, प्रत्येक वर्षाची गुणपत्रिका प्रत, अनुभवाचा दाखला इ. साक्षांकित प्रती जोडणे व स्वत:चा नजीकच्या काळातील फोटो चिकटवणे आवश्यक आहे.

३. अर्जामध्ये उमेदवाराचे पूर्ण नाव व पत्ता, जन्म तारीख, जात व पोटजात, शैक्षणिक पात्रता, पूर्वानुभव आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार सेवाप्रवेशासाठी अर्जाच्या दिनांकास विवाहित असलेल्या उमेदवारांना विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे. प्रतिज्ञा पत्राचा नमुना परिशिष्ट 'अ' प्रमाणे आहे.

५. स्थानिक पोलीस स्थानकाचा संपूर्ण पत्ता अर्जावर नमूद करण्यात यावा. वयाची १६ वर्षे पूर्ण झाल्याच्या तारखेपासून अर्जाच्या तारखेपर्यंत स्वत:च्या निवासाचा पत्ता आणि संबंधित पोलीस स्थानक कार्यालयाचा पत्ता अर्जामध्ये नमूद करण्यात यावा.

६. शासन सेवेतील कर्मचाऱ्यांनी आपले अर्ज शासन नियमानुसार **Through Proper Channel** करणे आवश्यक आहे. अशा कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट शासन नियमानुसार शिथिलक्षम राहील.

७. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा व त्याबाबतचा "अधिवास प्रमाणपत्र" धारण करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.अपंग/१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-ब,दि.०६ मे, २००४ नुसार दिव्यांग व्यक्तींकरिता आरक्षित असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे संबंधित जिल्हयाच्या शासकीय रूग्णालयातील प्राधिकृत वैदयकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. तसेच दिव्यांग व्यक्तीची निवड झाल्यानंतर त्याची नियुक्ती करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यक मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करू शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करण्यात येईल.

९. निवड झालेल्या दिव्यांग उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सा यांचेकडून शासकीय सेवा करणेकरिता शारिरीक क्षमतेचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. नियुक्तीपूर्वी मूळ प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता व इतर. तसेच आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र/ दाखला त्याचप्रमाणे इतर आवश्यक मूळ कागदपत्र इ. छाननी नियुक्त प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही./नियुक्ती रद्द होईल. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे/ कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास त्याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

११. सदर नियुक्तीसाठी परिविक्षाधिन कालावधी दोन वर्षाचा राहील. सदरचा परिविक्षाधिन कालावधीमध्ये वाढ करणे अथवा सेवा संपुष्टात आणणे याबाबतचा अधिकार महापालिकेने राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणत्याही उमेदवारास तक्रार अगर वाद करता येणार नाही.

१२. अर्जाच्या दिनांकास विवाहित असलेल्या उमेदवारांनी २ पेक्षा अधिक अपत्ये नसल्याचे प्रमाणपत्र जोडावे.

१३. दिव्यांगत्वाबाबत संबंधित जिल्हा चिकित्सक शासकीय रूग्णालय यांनी दिलेल्या किमान ४०% दिव्यांगत्वाचा दाखला यांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. मूळ दाखला जोडू नये.

१४. जास्तीत जास्त दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

१५. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना ठाणे महानगरपालिकेच्या **www.thanecity.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सही /-
महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**अर्जाचा नमुना**

'-----------------' या पदासाठी अर्ज

प्रति,
मा.आयुक्त सो.
ठाणे महानगरपालिका,ठाणे

संपुर्ण नाव: -----------------------------------------------------------------------------------------------------------

पत्रव्यवहाराचा पत्ता :------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------ दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.-----------------------------------
ईमेल आयडी____________________________________________________________________________

जन्मतारीख

| तारीख | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

दि.०५/१०/२०१७ रोजीचे वय

| दिवस | महिने | वर्ष |
|---|---|---|
| | | |

लिंग :- पुरुष स्त्री

राष्ट्रीयत्वा :- मातृभाषा :-

**जात:-** **जातीचा प्रव्रर्ग:-** **जात वैधता प्रमाणपत्र** (आहे/नाही):-

सरकारी / निम सरकारी कर्मचारी (आहे / नाही) (असल्यास ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.)

जाहिरातीत नमूद प्रवर्गातील दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र आहे / नाही

दिव्यांगत्वाचा प्रवर्ग

दिव्यांगत्वाचे प्रमाण ( टक्केवारीमध्ये)

**शैक्षणिक अर्हता :-**

| **उत्तीर्ण केलेली परिक्षा** | **विद्यापीठ/मंडळाचे नाव** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेले गुण** | **एकुण गुण** | **टक्केवारी/श्रेणी** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**अनुभव:-**

| **संस्थेचे नाव** | **पदनाम** | **कालावधी** | | **अनुभव प्रमाणपत्र जोडले आहे / नाही** |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष | महिने | |
| | | | | |
| | | | | |

उमेदवारास पुर्वी फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणात शिक्षा झाली होती का? किंवा सद्यस्थितीत त्यांचेवर फौजदारी अथवा दिवाणी गुन्हा दाखल आहे का? असल्यास तपशील लिहावा. ------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------

ठिकाण : ठाणे अर्जदाराची सही

दिनांक: / /२०१७ (अर्जदाराचे नांव)

---

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार
अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना
प्रतिज्ञापन

नमुना अ (नियम ४ पहा)

मी.श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------------------------------------------------------
श्री. -------------------------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी, वय--------- वर्ष
राहणार --------------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,
१. मी -------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ------------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ (---------------------)
दिनांक : अर्जदाराचे सही

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार ती पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्यांबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

ठिकाण :ठाणे

अर्जदाराची सही

दिनांक: / /२०१७

(अर्जदाराचे नांव)

स्थानिक पोलिस स्टेशनचा पत्ता :-